सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/०८९ **मुदत वाढ** दिनांक : ०८/०७/२०२६

प्रति,
**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था/
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांच्या माहितीबाबत..**
**संदर्भ क्र.** : या विभागाचे विविमं/२०२६–२७/०७३ दिनांक ०८/०७/२०२६ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधून विद्यार्थी विकास मंडळामार्फत आपल्या महाविद्यालयातील **कलाकार विद्यार्थ्यांची प्राथमिक नोंदणी बुधवार, दिनांक १४ जुलै, २०२६ पर्यंत भरण्याबाबत** कळविण्यात आले होते.

वरील संदर्भीय पत्राच्या अधिन राहून कलाकार विद्यार्थ्यांची प्राथमिक नोंदणी करण्याची **मुदत वाढ शनिवार, दिनांक १८ जुलै, २०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

संघातील विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता या विभागामार्फत दरवर्षी पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विद्यार्थ्यांकरिता जल्लोष युवक महोत्सवाचे विभाग/जिल्हानिहाय आयोजन करण्यात येत असते. यामध्ये संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य आणि ललित कला असे कलाप्रकार व त्यातील उपप्रकार असतात. आपला संघ तयार होण्याच्या दृष्टीने कलाप्रकारांमधील कलाकार विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध झाल्यास त्याचा उपयोग नजिकच्या काळात येणाऱ्या विविध स्पर्धेसाठी होईल म्हणूनच आपणास आवाहन करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांची प्राथमिक नोंदणी खालील लिंक द्वारे मुदत वाढीतच शनिवार, दिनांक १८ जुलै, २०२६ पर्यंत भरावी.

| माहिती भरण्याची लिंक |
| --- |
| https://forms.gle/Y5uL4A7VnHsCZGdG7 |

तरी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेमार्फत जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा. तसेच आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे ही विनंती.

संपर्क क्र. : ०२०२५६२२६८०

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/०७३ दिनांक : ०८/०७/२०२६

प्रति,

**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था/
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : महाविद्यालयातील कलाकार विद्यार्थ्यांच्या माहितीबाबत..**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळातंर्गत विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रमाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येते. महामहिम राज्यपाल तथा मा. कुलपती यांचे आदेशान्वये महाराष्ट्र राज्यातील कृषि व अकृषि विद्यापीठांतील विद्यार्थ्यांकरिता इंद्रधनुष्य युवक महोत्सव, भारतीय विश्वविद्यालय महासंघ, नवी दिल्ली यांचेद्वारा दक्षिण पश्चिम विभागीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय युवक महोत्सव व यासारख्या विविध युवक महोत्सवात या विभागामार्फत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संघ सहभागी होत असतो.

संघातील विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता या विभागामार्फत दरवर्षी पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विद्यार्थ्यांकरिता जल्लोष युवक महोत्सवाचे विभाग/जिल्हानिहाय आयोजन करण्यात येत असते. यामध्ये संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य आणि ललित कला असे कलाप्रकार व त्यातील उपप्रकार असतात. आपला संघ तयार होण्याच्या दृष्टीने कलाप्रकारांमधील कलाकार विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध झाल्यास त्याचा उपयोग नजिकच्या काळात येणाऱ्या विविध स्पर्धेसाठी होईल म्हणूनच आपणास आवाहन करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील **कलाकार विद्यार्थ्यांची प्राथमिक नोंदणी खालील लिंक द्वारे बुधवार, दिनांक १४ जुलै, २०२६ पर्यंत भरावी.**

| माहिती भरण्याची लिंक |
|---|
| https://forms.gle/Y5uL4A7VnHsCZGdG7 |

तरी आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेमार्फत जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा. तसेच आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर सदर पत्र प्रदर्शित करुन विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्याबाबत संबंधितास सूचित करावे, कळावे ही विनंती.

संपर्क क्र. : ०२०२५६२२६८०

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ